**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.४०)**

**गुरुवार, दिनांक २२ एप्रिल २०२१**

काही ठळक बातम्या ................................

- १८ वर्षा वरील नागरिकांच्या लासिकरणाची नोंदणी २८ एप्रिलपासून सुरू होणार.
- आज रात्री ८ वाजतापासून राज्यात कडक निर्बंध, विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाईचा इशारा.
- राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईनच होणार, उच्च शिक्षण मंत्री सामंत यांची स्पष्टोक्ती.

आणि

- अकोल्यातील नंदखेड गावाने घातला आदर्श , गावात एकही कोरोंना रुग्ण नाही.

नोंदणी प्रक्रीया

कोविड लसीकरणासाठी 18 वर्षावरील सर्वांसाठी लसीकरण नोंदणी प्रक्रिया या महिन्याच्या 28 तारखेपासून सुरू होईल. हे पात्र व्यक्ती को-विन पोर्टल - cowin.gov.in वर नोंदणी करू शकतात. कोविड लसीकरणाचा तिसरा टप्पा मे महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरू होत आहे. 18 पेक्षा जास्त वय असणा-या लाभार्थींसाठी की 24 एप्रिल पर्यंत कोविन पोर्टल तयार केले जाणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे.

या टप्प्यात, शासकीय लसीकरण केंद्रामध्ये पूर्वीप्रमाणेच आरोग्य सेवा कामगार, फ्रंट लाइन कामगार आणि 45 वर्षावरील सर्व वयोगटातील पात्र लोकांसाठी लसीकरण सुरू राहील. सदर टप्प्यात, लस उत्पादक त्यांच्या मासिक लसपुरवठा प्रमाणात 50 टक्के डोस केंद्र सरकारला पुरवतील आणि उर्वरित 50 टक्के डोस राज्ये तसेच खुल्या बाजारात पुरवतील.

कोरोंना / लस-बाधित

देशात आतापर्यंत १३ कोटी २२ लाखांहून अधिक कोरोनालसींच्या मात्रा देण्यात आल्या आहेत. यामध्ये ९२ लाख आरोग्य कर्मचाऱ्यांनी लसीची पहिली तर ५८ लाख लोकांनी दुसरी मात्रा घेतली आहे.

दरम्यान , देशात काल ३ लाख १४ हजार नव्या रुग्णांची नोंद झाली. आतापर्यंत एका दिवसात रुग्ण सापडण्याचा हा उच्चांक आहे. त्यामुळे देशातल्या एकूण कोविड बाधितांची संख्या, एक कोटी ५९ लाख झाली आहे. काल दोन हजार १०४ रुग्णांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर जवळपास ७८ हजार रुग्ण बरे झाले. देशात आतापर्यंत या विषाणू संसर्गानं एक लाख ८४ हजार रुग्णांचा मृत्यू झाला असून, एक कोटी ३४ लाखांहून अधिक रुग्ण, कोरोना विषाणू मुक्त झाले आहेत. सध्या देशभरात २२ लाख ९१ हजार रुग्णांवर उपचार सुरु आहेत.

मुंबई उच्च न्यायालय

ही आणिबाणीची परिस्थीती आहे याचे तुम्ही भान ठेवायला हवे अशा शब्दात आज मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहे. कोरोनाकाळातल्या अव्यवस्थेच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या एक जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं हे मत नोंदवलं आहे.

कोविड १९ च्या संदर्भातल्या सर्व मार्गदर्शक सूचना या मुद्रित माध्यमांना आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांना द्यायला हव्यात यावर न्यायालयानं भर देतांनाच समाजमाध्यमं यात आणखी गोंधळ घातल असल्याचंही न्यायालयान व्यक्त केलं. कोविड उपचारासाठीच्या अत्यावश्यक औषधांच्या माहितीसाठी एक पोर्टल असायला हवे असेही न्यायालयानं म्हटलं आहे. मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता यांच्या खंडपिठानं मुंबईतल्या एका वकिलाने दाखल केलेल्या एका जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान ही निरिक्षण नोंदवली.

जिल्हा प्रशासन तयारी

नाशिक महानगर पालिकेच्या डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात काल झालेल्या ऑक्सिजन दुर्घटना प्रकरणी नाशिक पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. डॉ.झाकीर हुसेन रूग्णालयात काल सकाळी पावणे बारा वाजता ऑक्सिजन टाकीतून गळती झाल्याने रुग्णांना प्राणवायू कमी पडला आणि त्यामुळे २५ रुग्णांचा मृत्यू झाला होता या घटनेसंदर्भात पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस आयुक्त दिपाली खन्ना यांच्याकडे तपास सुपूर्द केला आहे.

राज्य / कडक निर्बंध

महाराष्ट्र राज्यातल्या कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल राज्यात सध्या लागू असलेले निर्बंध आणखी कडक केले. गर्दीला अटकाव घालण्यासाठी अत्यावश्यक सेवेतले कर्मचारी वगळता प्रवासावर निर्बंध घालण्यात आले आहेत. आज रात्री आठ वाजल्यापासून येत्या 1 मे च्या सकाळी सात

वाजेपर्यंत हे निर्बंध लागू असतील. जीवनावश्यक वस्तू, फळे, भाजीपाला आदीची दुकानं सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत सुरु राहतील.तर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था,महानगरपालिकांची परिवहन सेवा, रिक्षा या सारख्या सेवाही सुरु असतील.

मुंबईतील रेल्वे सेवासुद्धा केवळ अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आणि तात्काळ उपचाराची गरज असलेल्या रुग्णांसाठीच सुरु राहील. खासगी वाहनंसुद्धा पन्नास टक्के क्षमतेनं चालवता येतील. मात्र फक्त अत्यावश्यक कारणांसाठीच वाहनांचा वापर करता येईल. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जाता येणार नाही केवळ नातेवाईकांचं आजारपण किंवा अंत्यसंस्कार या कारणांसाठीच दुसऱ्या शहरात जाता येईल. या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांना दहा हजार रुपये दंड आकारण्यात येईल. तर एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात प्रवास करणाऱ्यांना चौदा दिवसांसाठी गृह विलगीकरणात रहावं लागेल. कोरोना साथ नियंत्रण व्यवस्थापनाशी संबंधित कार्यालयं वगळता अन्य सरकारी कार्यालयांमध्ये फक्त पंधरा टक्केच उपस्थितीला परवानगी देण्यात आली आहे. तर अत्यावश्यक सेवेच्या कार्यालयात पन्नास टक्के उपस्थिती ठेवता येईल. तर लग्न समारंभाला केवळ पंचवीस जणांच्या उपस्थितीला आणि फक्त दोन तास इतक्याच वेळेसाठी परवानगी देण्यात आली आहे.

उदय सामंत / परीक्षा

कोरोनाचा वाढता संसर्ग आणि कठोर निर्बंधांमुळं राज्यातील सर्व १३ अकृषी विद्यापीठातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीनं घेतल्या जाणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली आहे. विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सामंत यांनी ही माहिती दिली. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे ऑफलाईन परीक्षा घेणं शक्य नसल्याचं कुलगुरूंनी बैठकीत सांगितलं. त्यामुळे आता ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यापीठांनी तातडीने यंत्रणा तयार करावी असे निर्देश दिल्याचं ते म्हणाले. आगामी शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासाठी १५ दिवसात पुन्हा कुलगुरूंसोबत बैठकी घेतली जाईल असंही सामंत यांनी सांगितलं. एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही देतानाच विद्यार्थ्यांनी विद्यापीठात गर्दी करू नये असं आवाहनही त्यांनी केलं. विद्यार्थ्यांचं लसीकरण विद्यापीठामार्फतच करण्याचा विभागाचा मानस आहे. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाशी चर्चा करण्यात येणार असल्याचं सामंत यांनी स्पष्ट केलं.

विदर्भ - कोरोना

नागपूर जिल्हयात आज 7 हजार 334 नवे करोनाबाधित आढळले असून एकूण करोना बाधितांची संख्या 3 लाख 50 हजार 933 इतकी झाली आहे. 6 हजार 314 जण आज या आजारातून बरे झाले असून बरे झालेल्यांची संख्या 2 लाख 71 हजार 771 वर पोहचली आहे.. या आजाराने आज 110 मृत्यू झाले असून जिल्हयातील एकूण मृत्युमुखींची संख्या 6 हजार 685 झाली आहे तर भंडारा जिल्हयात आज 1568 रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. बरे झालेल्या रुग्णांची संख्या 29365 झाली असून आज 947 नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या 41461 झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण 70.82 टक्के आहे. गडचिरोली, जिल्हयात आतापर्यंत १६ हजार ९३६ जण कोरोनाबाधित आढळून आले आहेत. त्यातील २८० जणांचा मृत्यू झाला आहे, तर १२ हजार ७७३ रुग्ण बरे झाले आहेत. बुलडाणा शहरात संचारबंदी दरम्यान फिरणाऱ्या १९३ जणाविरुद्ध पोलीस प्रशासनाने कारवाई केली आहे.तब्बल ३ दिवसामधील हा प्रशासनाचा आकडा समोर आला आहे. वाशीम जिल्हयात उद्या सकाळपर्यंत २०० जम्बो सिलेंडर, ६ ते ८ ड्युरा सिलेंडर प्राप्त होणार आहेत. त्यामुळे वाशिम जिल्हयात प्राणवायूचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

जिल्हा प्रशासन तयारी

भंडारा जिल्हयात कोरोना रुग्णांची सतत वाढ होत असल्यामुळे वाढत्या कोरोना बाधीत रुग्णांची सेवा करण्याकरीता मनुष्यबळ कमी पडत आहे. त्यामुळे शासनाचे निर्देशानुसार कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. १६ पदे, वैद्यकीय अधिकारी आयुष यांची ११ पदे, स्टाफ नर्सचे ८० पदे तसेच आरोग्य सेविकांची १४२ पदे भरण्यात आलेली आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना माहिती पुरविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात आला आहे. ०७१८४ - २५१२२२ या क्रमांकावर फोन करून कोविड उपचारासंबंधित माहिती मिळविता येणार आहे.

अकोला–कोवीड सेंटर

अकोला जिल्हा परिषदेने कर्मचारी भवन येथे 50 बेडचे ऑक्सिजन युक्त कोविड केअर सेंटर सुरू केले आहे. या सेंटरचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज केले. विशेष म्हणजे, राज्यातील ही पहिली जिल्हा परिषद आहे, जिने कोविड केअर सेंटर सुरू केले असल्याचा दावा वंचितने केला आहे. कोरोना रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे शासकीय यंत्रणेवर ताण येत आहे. शासकीय वैद्यकीय रुग्णालयात अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अकोला ही 50 बेडचे कोविड

केअर सेंटर सुरू करेल, असे वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले होते. त्यानुसार त्यांनी या कोविड केअर सेंटरचे उद्घाटन जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे केले.

## आशा सावदेकर निधन

मूळच्या नागपूरकर आणि सुप्रसिद्ध साहित्यिक आणि समीक्षक डॉ. आशा सावदेकर यांचे आज नागपूरात सकाळी निधन झाले. त्या ७२ वर्षाच्या होत्या. १९७५ साली त्यांना पीएच.डी. ही पदवी मिळाली. 'कविवर्य भा.रा.तांबे यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांचे कविताविषयक महत्त्वाचे संपादन म्हणजे 'कविता विदर्भाची' या ग्रंथात त्यांनी विदर्भातील निवडक कवींच्या वैशिष्ट्यपूर्ण कवितांचे संकलन केले. डॉ.वि.वा.प्रभुदेसाईंच्या सहकार्याने 'आजचे मराठी साहित्य' हा ग्रंथही त्यांनी लिहिला. दरम्यान आशाताईंनी अतिशय विपूल लेखन केले. त्यांनी आपल्या स्तंभलेखनातून अनेक साहित्यिक, लेखक, कवी समाजापुढे उलगडून दाखवले. आशाताईंचे निधन ही साहित्य विश्वाची आणि मराठीची अपरिमित हानी आहे, अशी शोकसंवेदना राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

## कोरोना प्रतिबंध

अकोला जिल्ह्यासह पातुर तालुक्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असताना नांदखेड गावांमध्ये कोरोनाला वेशीवरच रोखण्यात यश मिळविले आहे. आज पर्यंत गावात एकही कोरोना बाधित रुग्ण आढळला नाही. गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे कोरोना गावात प्रवेश करू शकला नाही. माझे कुटुंब माझी जबाबदारी या उपक्रमामुळे मोठी मदत झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. एकीच्या जोरावर आणि जागृतीच्या आधारे संपूर्ण गाव कोरोनावर मात करण्यात यशस्वी ठरले आहे.

या मोहिमेअंतर्गत ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीने गावात सर्वेक्षण, नागरिकांची कोरोना चाचणी, अनेक लोकांच्या संपर्कात येणारे दुकानदार आदींवर भर दिला. ग्रामस्थांची एकता ही मोठी ताकद ठरली असून त्याचा फायदा कोरोना संकट काळात झाला आहे. कोरोना दूत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करीत होते एखाद्या व्यक्तीला ताप, खोकला, घशात खवखवणे, थकवा, श्वास घेण्यास त्रास, अशा प्रकारचा त्रास होत आहे काय याची त्वरित दखल घेतल्या जात होती. नागरिकांना कोरोना विषयी माहिती देण्यात येत होती. नागरिकांच्या एकीने आणि कोरोना विषयक घेतलेल्या काळजीने नांदखेड वासियांनी कोरोनाला वेशीवर रोखले आहे.

The End